# उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांचे कार्यालय
'वनभवन', गोडोली रोपवाटीका, सातारा ४१५ ००१
☎ (०२१६२)२२००५८, फॅक्स : (०२१६२) २२००५९ ईमेल : forest.satara68@gmail.com


जा.क्र. ब/जमीन/19.20/ 4415
सातारा: 415 001 दिनांक: 13 /03/2020

प्रति,

जनरल मॅनेजर (टेक)
प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
स. नं. 134/1 बायफभवन कॅम्पस,
वारजे, पुणे.

विषय :- पुणे-सातारा NH-4 रस्त्यामधील वनजमीनीतुन जाणा-या खंबाटकी घाट रुंदी करणासाठी लागणा-या 13.475 हे. वनजमीन प्रस्तावाबाबत.
संदर्भ :- मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचेकडिल क्र. कक्ष-6/नोसेल/सातारा/खंबा.घाट/7937 दिनांक 11/03/2020.

विषयांकीत प्रकरणी आपलेकडील वन (संवर्धन) अधिनिमय, 1980 अंतर्गत सादर करणेत आलेल्या प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांचेकडे सादर करणेत आला होता. प्रकरणी सादर करणेत आलेल्या प्रस्तावात त्यांचेकडील दिनांक 17/02/2020 अन्वये काही त्रुटी पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले होते, त्याप्रमाणे त्रुटीची पुर्तता करुन या कार्यालयाचे दिनांक 03/03/2020 चे पत्रान्वये वरिष्ठ कार्यालयास सादर करणेत आला होता. परंतु प्रकरणी सादर करणेत आलेल्या अहवालामध्ये संदर्भीय पत्रान्वये काही त्रुटी कळविणेत आलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे आहेत.

केंद्रशासनाचे तत्वत: मान्यतेच्या पत्रातील अट क्र. 23 (b) नुसार Rescue Center उभारणेकरीता लागणारी आवश्यकत ती पुर्ण रक्कम वसुल करनेबाबत कळविण्यात आले आहे. याप्रकरणी सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नागपुर यांचे कार्यालयाकडुन आवश्यकत ती तांत्रिक माहिती घेत आहोत, याबाबत सदर कार्यालयाकडुन तांत्रिक माहिती (अंदाजपत्रक, आराखडा इ.) प्राप्त होताच आपणास तसे अवगत करण्यात येईल, त्याप्रमाणे Rescue Center उभारणेकरीता जी काही रक्कम आवश्यक असले ती आपणस भारणा करणे बंधण कारक राहील. त्याप्रमाणे हमीपत्र सादर करावे.

तसेच अट क्र. 25 चे अनुषंगाने 260 कृत्रीम घरटी बांधणेकरीता प्रति घरटे 500/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये 130000/- ऐवढी भरणा करावी लागेल. तरी सदर रक्कमेचा ई-पोर्टल व्दारे कॅम्पा, नवी दिल्ली कडे भरणा करुन भरणा केलेबद्दल बँक स्टेटमेंट / चेकची प्रत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

त्याच प्रमाणे अट क्र. 29 नुसार प्रकल्प यंत्रणेने पार्ट 1 मध्ये सुधारणा करुन त्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

प्रकरणी वरील प्रमाणे मागणी केलेला अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल, ही विनंती.

(डॉ. भारत सिंह हाडा)
**उपवनसंरक्षक**
**सातारा वन विभाग सातारा**

प्रत - वनक्षेत्रपाल, खंडाळा व वाई यांना माहितीसाठी व नोंद घेण्यासाठी.
2/- प्रकरणी केंद्रशासनाचे तत्वत: मान्यतेच्या पत्रातील अट क्र. 23 (b) नुसार Rescue Center उभारणेकरीता सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नागपुर यांचे कार्यालयाशी संपर्क साधुन Rescue Center उभारणेकरीता आवश्यकत ती पुर्ण माहिती प्राप्त करुन घेऊन तसे प्रस्तावित जागा, अंदाजपत्र व रक्कम या कार्यलयास 3 दिवसात सादर करावे.
प्रत - सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण), (रोहयो व वन्यजीव), सातारा यांना माहितीसाठी.
प्रकरणी आपले अधिनस्त वनक्षेत्रपाल यांचेकडुन सदरची माहिती वेळेत सादर करणेबाबत सुचना देणेत याव्यात.

कार्यालय - ०२३१/२६५३६३२,
E-mail ID -
ceftkolhapur@mahaoforest.gov.in
ceftkolhapur@gmail.com

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**
"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३

क्रमांक कक्ष-६/नोसेल/सातारा/खंबा.घाट/१९-२०/ ७९३७
कोल्हापूर -४१६००३ दिनांक - ११/०३/२०२०.

**विषय :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ पुणे-सातारा खांबाटकी घाट नवीन बोगदा करण्यासंदर्भात वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव. क्षेत्र ७.२६ हेक्टर.

**संदर्भ :** १. पर्यावरण वन एव जलवायू परिवर्तन मंत्रालय यांचेकडील पत्र क्र FC-II/MH-90/2018- दिनांक २६.११.२०१८.
२. आपलेकडील पत्र अ/जमीन/२०१९-२०/५२७ दिनांक २९.०६.२०१९.
३. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/खंबा.घाट/१९-२०/२३२८ दिनांक २०.०८.२०१९
४. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/खंबा.घाट/१९-२०/२३६४ दिनांक २०.०८.२०१९
५. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/खंबा.घा/२०१९-२०/३७२१ दिनांक २९.११.२०१९.
६. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/खंबा.घा/२०१९-२०/७५८५ दिनांक १७.०२.२०२०.
७. आपलेकडील पत्र क्र. ब/जमीन/१५३९/२०१९-२० दिनांक ३.०३.२०२०.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. १ अन्वये केंद्र शासनाने सदर प्रस्तावास १ ते ३५ अटींचे अधीन राहून प्रथम स्टेज मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने आपलेकडील वरील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये अटी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अटी पूर्तता अहवालामध्ये त्रुटी असल्याने सदरचा अटी पूर्तता अहवाल संदर्भ क्र. ३ व ४ चे पत्रान्वये त्रुटींची पूर्तता करणेसाठी आपणास परत पाठविण्यात आलेला आहे. तसेच संदर्भ क्र. ५ व ६ अन्वये आपणास त्रुटी पूर्तता अहवाल १ आठवड्यात सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. आता संदर्भ क्र. ७ अन्वये आपलेकडून त्रुटी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.
सदर अहवालाचे अवलोकन केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येत आहेत.

१. केंद्र शासनाचे तत्वतः मान्यतेच्या पत्रातील अट क्र. २३(B), २५ खालीलप्रमाणे आहे :

23(b)- The User agency shall bear the cost of animal rescue centre being established by the state Forest department for the animals injured in road accidents near the tunnel.

सदर प्रकरणी आपलेकडून प्रकल्प यंत्रणेने rescue centre करिता ५० लाख रु. Ad hoc CAMPA चे खात्यात भरणा केले असून आणखी रक्कम भरावी लागलेस प्रकल्प यंत्रणेने त्याबाबत हमीपत्र सादर केले आहे. परंतु संदर्भ क्र. ७ अन्वये आपणास सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नागपूर यांचे कार्यालयाशी साधून rescue centre उभारनेकामी लागणारी आवश्यक तांत्रिक माहिती (अंदाजपत्रक, आराखडा ई.) प्राप्त करून घेऊन त्याआधारे प्रकल्प यंत्रणेकडून रक्कम वसूल करनेबाबत कळविण्यात आलेले आहे. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

25- The user agency in consultation with the State Government shall create and maintain alternate habitat/home for the avifauna, whose nesting trees are to be cleared in this project. Birds' nests artificially made out of eco-friendly material shall be used in the

area, including forest area and human settlement adjoining the forest area being diverted for the project and a scheme to this affect will be submitted along with Stage-I compliance.

अट क्र. २५ चे अनुषंगाने योजना तयार करून प्रकल्प यंत्रणेकडून त्याचे पैसे वसूल करणे आवश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी आपलेकडून प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले हमीपत्र अहवालासोबत सादर केले आहे. सदर प्रकरणी कृत्रिम घरट्याबाबत योजना तयार करून प्रकल्प यंत्रणेकडून रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

२. अट क्र. २ चे अनुषंगाने **१५ हेक्टर अवनत वन क्षेत्रावर पर्यायी वनीकरण** करावयाचे आहे. पर्यायी वनीकरनाबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/मुले/अंदाजपत्रक/प्रक्र.४०/११२७/२०१९-२० दिनांक ४.१०.२०१९ नुसार कार्यवाही करणे कळविण्यात आलेले आहे. परंतु आपलेकडून आता **अहवालासोबत १० हेक्टर वरील पर्यायी वनीकरणाची सुधारित योजना सादर केलेली आहे. उर्वरित ५ हेक्टर वरील पर्यायी वनीकरणाची योजना सादर केलेली नाही.** तसेच प्रचलित दराने पर्यायी वनीकरणाची रक्कम वसूल केलेली नाही.

३. तसेच अट क्र. २९ नुसार प्रकल्प यंत्रणेने Part I मध्ये सुधारणा करून त्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

सदर प्रकरणी केंद्र शासनाचे तत्वतः मान्यता पत्रातील १ ते ३५ अटींचे अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेकडून परिपूर्ण पूर्तता करून घेऊन अटींची पूर्तता झाल्याचे खात्री करून वन विभागाशी संबंधित मुद्यावर आपले अभिप्राय नमूद करून अटी पूर्तता अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसेच अटी पूर्तता अहवालासोबत जोडण्यात येणाऱ्या दस्तऐवजांना Annexure नंबर देऊन परिपूर्ण अहवाल चार प्रतीत या कार्यालयास सादर करावा. राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित प्रकल्पासंदर्भात केंद्र शासन तसेच राज्य शासनाकडून वेळोवेळी आढावा घेतला जातो. त्यामुळे सदर प्रकरणी प्रकल्प यंत्रणेकडून त्रुटींची पूर्तता तात्काळ करून घेऊन परिपूर्ण अटी पूर्तता अहवाल आवश्यक दस्तऐवज/नकाशा/कागदपत्रासह या कार्यालयास १ आठवड्यात सादर करावा. यास अधिक विलंब होऊन भविष्यात काही पेचप्रसंग उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपले कार्यालयाची राहील याची गांभिर्याने नोंद घेण्यात यावी.

(डॉ.व्ही.क्लेमेंट बेन)
**मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

**प्रति,**

डॉ.भारतसिंह हाडा,उपवनसंरक्षक सातारा.

**प्रतिलिपी :** जनरल मॅनेजर (टेक.), प्रकल्प संचालक, भारतीय राजमार्ग प्राधिकरण, स.न. १३४/१, बायफभवन, कॅम्पस वारजे, पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.